# जाहिरात

शासन महसूल व वनविभागाकडील निर्णय दिनांक 06 एप्रिल 2011 अन्वये जिल्हाधिकारी जळगांव यांचे आस्थापना येथील कार्यालयासाठी 1 विधी अधिकारी कंत्राटी पध्दतीने भरण्याकरिता मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी जळगांव यांचे आस्थापनेवर **विधी अधिकारी** हे पद 11 महिन्यांचे **कंत्राटी तत्वावर** (एकत्रित मानधन दरमहा रक्कम रु. 20,000/-आणि दुरध्वनी व प्रवास खर्च रु.5000/- ठोक स्वरुपात) भरण्याकरिता **दिनांक** 15/06/2017 पर्यंत कायद्याचा पदवीधर (**L.L.B.**) व सनद धारण करणा-या पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

विधी अधिकारी हे पद कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी यापदासाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, कर्तव्य व जबाबदा-या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या असून, यापदावर निवड झाल्यानंतर करावयाचा करारनामा परिशिष्ट – ब मध्ये व परिशिष्ट-क मध्ये अटी, शर्ती व इतर सर्वसाधारण माहिती नमूद करण्यात आलेली असून अर्जाचा नमुना व उक्त परिशिष्ट अ, ब आणि क जिल्हाधिकारी जळगांव यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत तसेच खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी परिशिष्ट-अ, ब आणि क, तसेच अर्जाचा नमुना या कार्यालयातून प्राप्त करुन घेतल्यानंतर / संकेत स्थळावरुन प्राप्त करुन घेतल्यानंतर विहित नमुन्यात अर्ज करावा.

http://www.jalgaon.nic.in

**जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव**

क्र.आस्थाप/मावक/कावि/ 2017/1/9/02

जळगांव. दि.29/05/ 2017

स्वाक्षरीत/-

**(किशोरराजे निंबाळकर)**

**अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा**

**जिल्हाधिकारी जळगांव**

( राहुल मुंडके )

**सदस्य सचिव तथा**

**निवासी उपजिल्हाधिकारी जळगांव**

# परिशिष्ट-क

# जिल्हाधिकारी जळगांव यांचे कार्यालय

आकाशवाणी जवळ जळगांव
दुरध्वनी क्र. 0257- 2220152 फॅक्स क्र. 2220500
**********************************************
क्र.आस्थाप/मावक/कावि/ 2017/1/9/02 दि. 29/05/2017

जिल्हाधिकारी जळगांव यांचे आस्थापनेवर विधी अधिकारी हे 1 पद 11 महिन्यांचे कंत्राटी तत्वावर भरण्याकरता दि. 15/06/2017 पावेतो पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. या बाबत अटी, शर्ती व इतर सर्वसाधारण माहिती खालीलप्रमाणे आहे.

**अटी,शर्ती**

1. सदर पदाची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. सदरहू विधी अधिकारी शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाहीत .
2. सदर नेमणुका करार पध्दतीने प्रथमत: 11 महिन्यांसाठी करण्यात येतील. 11 महिन्यानंतर आवश्यक असल्यास कारर नाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापि, अशी मुदत वाढवितांना एकावेळी ही मुदत 11 महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी असणार नाही. अशाप्रकारे जास्तीत जास्त 3 वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर पुनश्च नियुक्ती करावयाची असल्यास पुनश्च निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.
3. नियुक्तीचे वेळी विहित प्रपत्र-ब मध्ये करार करावा लागेल.
4. करार पध्दतीने नेमणूक करण्यात आल्यानंतर एकत्रित मानधन आणि अनुज्ञेय दूरध्वनी व प्रवासखर्चा व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

**इतर सर्वसाधारण माहिती**

1.पदाचे नांव - विधी **अधिकारी**

2.पद संख्या - **(एक)**

3.मानधन - एकत्रित मानधन दरमहा रक्कम रु.20,000/-आणि दुरध्वनी व प्रवास खर्च रु.5000 /- ठोक स्वरुपात.

4.अर्जासोबत उमेदवाराने खालील कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे बंधनकारक असून तसे न केल्यास अर्ज अपात्र ठरेल.

1.विहितनमुन्यातीलअर्ज.

2.पदवीप्रमाणपत्र

3.कायद्याच्या पदवीबाबत चे प्रमाणपत्र

4.इतर अतिरिक्त शैक्षणिकअर्हतेबाबतची प्रमाणपत्रे.

5.सनद

6.शाळा सोडल्याचा दाखला / जन्म दाखला.

7.वकीली व्यवसायाचे किमान 7 वर्षे अनुभवाचे प्रमाणपत्र.

8.शासकीय कामाचा अनुभवअसल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र.

9.मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांचे ज्ञान असलेबाबतची प्रमाणपत्रे.

5.अर्ज सादर करण्याची मुदत- **दि. १५/०६/२०१७**

कार्यालयीन कामकाजाचे वेळेत व दिवशी.

विधी अधिकारी या पदासाठी **लेखी परीक्षा आणि मुलाखत अथवा केवळ मुलाखत** घेण्यात येईल. लेखीपरीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास लेखीपरीक्षेची सुचना उमेदवारांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या पत्यावर साध्या टपालाने तसेच ई-मेलव्दारे कळवण्यात येईल.

**स्थळप्रतीवर मा जिल्हाधिकारी जळगांव**
**यांची स्वाक्षरी असे**

**( राहुल मुंडके )**
**सदस्य सचिव तथा**
**निवासी उपजिल्हाधिकारी जळगांव**

परिशिष्ट "अ"

(महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक - ईएसटी-२०१०/प्र.क्र.४२/ई-८, दि. ३० जुलै, २०११.)

कत्राटी पध्दतीने नेमणूक करावयाच्या विधी अधिकारी या पदांसाठी शैक्षधिक अर्हता, अनुभव, कर्तव्य, व जबाबदा-या पुढीलप्रमाणे आहेत:-

**शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

१) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असेल. तो सनदधारक असेल.
२) विधी अधिकारी या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ७ वर्षांचा अनुभव आवश्यक राहील.
३) उमेदवार महसूल विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशा इ. बाबत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.
४) उमेदवारास मराठी, हिंदी, व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.
५) विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी ४५ वर्षांपेक्षा जास्त नसेल.

**विधी अधिकारी यांची निवड :**

विधी अधिकारी यांची निवड जिल्हा निवड समितीच्या अखत्यारित राहिल. तसेच संबंधित जिल्हाधिकारी हे नियुक्ती प्राधिकारी असतील.

**विधी अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदा-या :**

१) कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायलयीन प्रकरणे हाताळणे.
२) महसूल विषयक/ परिच्छेदनिहाय अभिप्राय (parawise comments) तयार करणे/ सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशी इत्यादी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.
३) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिका-यांच्या मदतीने तयार करणे.
४) शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेउन न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे.
५) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तद्नुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.
६) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.
७) विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

*****